सत्र खटला क्र. १०२/२०२२

निशाणी क्र. २३

(CNR No. MHST01001503-2022)

(महाराष्ट्र सरकार विरुध्द केतन फरांदे)

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा पुरावा

मी ईश्वर साक्ष ठेवून शपथेवर सांगतो की मी जे काही सांगेन ते सत्य सांगेन, संपूर्ण सत्य सांगेन आणि सत्याशिवाय दुसरे काहीही सांगणार नाही.

माझे नाव– अमोल वसंतराव शिंगटे,

आधार कार्ड क्र. ४२४८ ३९२१ ३०४२

वय– ३८ वर्षे व्यवसाय – शेती,

राहणार– मर्ढे, ता. जि. सातारा

**अभियोग पक्षातर्फे श्रीमती ए. एस. निंबाळकर सरकारी अभियोक्ता यांचेतर्फे सरतपास**

१. दिनांक २९/०७/२०१८ रोजी मर्ढे गावात मी उपसरपंच होतो. त्या दिवशी सकाळी ११.०० ते ११.३० सुमारास मी आणेवाडी गावकडे निघालो असता गावातील सुधाकर नारायण शिंगटे यांच्या घरासमोर एक वाळूने भरलेला ट्रॅक्टर व ट्रॉली आणेवाडीच्या दिशेने जाताना दिसली. सदर ट्रॅक्टर आरोपी केतन फरांदे हा चालवत होता. मी त्यास वाळु वाहतुकीचा परवाना आहे का असे विचारले असता त्याने व्हाटस्ॲपवर असलेली वाळू साठवणुकीची पावती दाखवली.

२. त्यानंतर मी कोतवाल रोहित लक्ष्मण धुमाळ यांना फोन केला. धुमाळ घटनास्थळी आले आणि त्यांनी केतनला नाव विचारले असता त्याने केतन सुरेश फरांदे, रा. आणेवाडी, ता. जावली असे सांगितले. कोतवाल याने केतनकडे वाळू वाहतुकीचा परवाना आहे का असे विचारले असता केतनकडे परवाना नव्हता. त्याने पुन्हा व्हाटस्ॲपमध्ये असलेली वाळू साठवणुकीची पावती दाखवली. त्यामुळे कोतवाल

JAGRUTI SUBHASH BHATIA

Digitally signed by JAGRUTI SUBHASH BHATIA
Date: 2025.12.23 17:30:22 +0530

धुमाळ यांनी तलाठी गोरे यांना मोबाईलवरून फोन केला. त्यांनी सांगितले की, सदरचे ट्रॅक्टर पकडलेले असून ट्रॅक्टर चालकाकडे वाळू वाहतुकीचा परवाना नाही. त्यावेळी कोतवाल धुमाळ यांनी ट्रॅक्टरची चावी काढून घेतली. तलाठी गोरे यांनी तहसिलदार चव्हाण यांना याबाबत कळवण्यास सांगितले असता धुमाळ यांनी तहसिलदार चव्हाण यांना फोनद्वारे माहिती दिली. यावर तहसिलदार चव्हाण यांनी कोतवाल यांना सदर ट्रॅक्टर तहसिल कार्यालयात पुढील कारवाईसाठी आणण्यासाठी सांगितले.

३. यावर केतन फरांदे यांनी तहसिल कार्यालयात जाण्यास नकार दिला. कोतवाल धुमाळ यांच्या हातातून ट्रॅक्टरची चावी घेऊन आरोपी केतन फरांदे हे ट्रॅक्टर घेवून निघून गेले. तहसिल कार्यालयात सदर ट्रॅक्टर घेवून बोलावले आहे असे सांगूनही आरोपी थांबला नाही व निघून गेला. त्या ट्रॅक्टर व ट्रॉलीला नंबर प्लेट नव्हती. त्यानंतर तहसिलदार यांना ही माहिती देण्यात आली. तहसिलदार व कोतवाल यांनी मिळून ट्रॅक्टरचा शोध घेतला परंतु ट्रॅक्टर मिळून आला नाही.

४. त्यानंतर रोहित धुमाळ यांनी शासकीय कामात आरोपीने अडथळा आणल्याने त्याच्याविरूध्द फिर्याद दिली व तपासात माझा जबाब घेण्यात आला. आरोपी केतन फरांदे आज रोजी न्यायालयात हजर आहे.

आरोपीकरीता विधीज्ञ श्री. जे.पी. भोसले यांच्यामार्फत उलटतपास

५. हे खरे की, यापुर्वी मी सहा सात वेळा याच खटल्यात साक्षीसाठी येवून गेलो. आजही मी सकाळी १०.३० वाजता न्यायालयात आलेलो आहे. माझा जबाब न्यायालयात आल्यावर वाचून पाहिला आहे. पुर्वी देखील मी तो वाचून पाहिला आहे. जबाब वाचल्यानंतर मी साक्ष देत आहे.

(सदर साक्षीदाराची साक्ष दुपारी ४.४५ मिनीटांनी नोंदवण्यात येत आहे. सकाळपासून न्यायालयात इतर दोन साक्षीदार तपासण्यात आले असून ए.सी.बी. खटला क्र. १९/२०१४ चा अंतिम युक्तीवाद देखील ऐकण्यात आलेला आहे. सदर मजकुर न्यायालयाच्या माहितीकरीता आहे. )

JAGRUTI SUBHASH BHATIA

Digitally signed by JAGRUTI SUBHASH BHATIA
Date: 2025.12.23 17:30:32 +0530

६. मी दहा वर्षे झाले गावातील राजकारणात आहे व मला प्रशासनातील सर्व बाबींचा अभ्यास आहे. कोतवाल तलाठयांसोबत शासकीय कर्मचारी म्हणून काम करतात. तलाठी रजेवर असल्यावर त्यांचा कामाचा कार्यभार दुसऱ्या तलाठी कडे दिलेला असतो. ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवक व सचिव हे देखील शासकीय कामासाठी नेमलेले असतात. उपसरपंच म्हणून काम करताना माझा संबंध ग्रामसेवक व सचिव यांच्याशी येतो. ग्रामसेवक व सचिव यांना सुचना देण्याचा व त्यांची मदत मागण्याचा मला अधिकार होता. कोतवाल यांना तलाठी आदेश देवू शकतो. पोलीस पाटील महेश पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष शिंगटे यांची नेमणुक सन २०१८ साली आमच्या गावी होती. घटनेच्यावेळी मी पोलीस पाटील अथवा तंटामुकती अध्यक्ष यांना बोलावले नाही. त्यांना बोलावण्यास मला काही अडचण नव्हती. २०१८ साली प्रांतधिकारी यांनी वाळू उत्खनन व चोरी रोखण्यासाठी तलाठी व सर्कल यांचे पथक नेमले होते. नदी पात्रातून वाळू उत्खनन केल्यानंतर वाळूचा साठा केला जातो. वाळू साठयाचा परवाना होता याचाच अर्थ वाळू नदीतून उत्खनन करून साठा करण्याची परवानगी असते. परवानाधारक ऐच्छिक ठिकाणी साठा करू शकते. अमान्य की, साठा करण्याची वाहतुक कायदेशीर असते. मी कधीही वाळूचा व्यवसाय केलेला नाही.

७. मर्ढे व आणेवाडी गावाच्यामध्ये कृष्णा नदी आह. अमान्य की, कृष्णा नदीतील वाळू ही दोन्ही गावातील लोक काढत होते. अमान्य की, नदी पात्रातील वाळू काढण्याचा संपुर्ण अधिकार हा केवळ मर्ढे गावातील लोकांचे आहे असे त्यांचे म्हणणे होते. अमान्य की, मर्ढे गावातील लोकांनी वाळू उपसा करावा असा आम्ही ठराव केला होता. या दोन्ही गावात अनेक लाल पिवळया रंगाचे बरेच ट्रॅक्टर आहेत. अमान्य की, कोणाकडे कोणते ट्रॅक्टर आहेत हे मला माहित आहेत. घटनेच्यावेळेला माझेकडे दुचाकी गाडी होती. रोहित धुमाळ यांच्याकडे देखील दुचाकी गाडी होती. हे खरे की, वाळूने भरलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीपेक्षा दुचाकी गाडी वेगात चालते. मर्ढे गावातून आणेवाडीकडे जाणारा रस्ता चढाचा आहे. कृष्णा नदीपात्र ते आमच्या गावात जाणारा रस्ता देखील चढाचा आहे. तलाठी व सर्कल यांचे मोबाईल क्रमांक माझेकडे होते. घटनेदिवशी मी

JAGRUTI SUBHASH BHATIA
Digitally signed by JAGRUTI SUBHASH BHATIA
Date: 2025.12.23 17:30:43 +0530

वैयक्तीक तलाठी किंवा सर्कल यांना फोन केला नाही. घटनेच्यादिवशी मर्ढे गावातील सुधाकर शिंगटे यांच्या घरासमोर लोकांची वर्दळ होती. नितीन भानुदास पाटील, सतिश अर्जुन बाबर हे माझे ओळखीचे आहेत. या दोन्ही व्यक्तींसोबत माझे चांगले संबंध आहेत. अमान्य की, मी त्यांना पंचनाम्यासाठी पोलीस ठाण्यात धेवून गेलो होते. अमान्य की, माझे सांगण्यावरून ते पोलीस ठाण्यात पंचनाम्यासाठी आले होते. अमान्य की, सुधाकर नारायण शिंगटे यांची व माझी घटनेदिवशी भेट झाली होती. अमान्य की, घटनेदिवशी माझे ओळखीचे व गावातील बरचेसे लोक घटनास्थळी जमले होते.

८. वाळूचा परवाना विचारण्याचा मला अधिकार नव्हता परंतु ग्रामपंचायत ठरावानुसार उपसरपंच या नात्याने मी परवान्याबाबत विचारले होते. पोलीसांनी माझा जबाब माझे सांगण्याप्रमाणे घेतला होता. मी पोलीसांना सांगितले होते की, सदर ट्रॅक्टर आरोपी केतन फरांदे हा चालवत होता. मी त्यास वाळु वाहतुकीचा परवाना आहे का असे विचारले असता त्याने व्हाटस्‌ॲपवर असलेली वाळू साठवणुकीची पावती दाखवली. तसा मजकुर माझे जबाबात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी असे देखील सांगितले होते की, कोतवाल धुमाळ यांनी आरोपीस थांबवण्याचा प्रयत्न केला असता तो थांबला नाही आणि तहसिल कार्यालयात सदर ट्रॅक्टर घेवून बोलावले आहे असे सांगूनही आरोपी थांबला नाही व निघून गेला. तसा मजकुर माझे जबाबात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

९. ग्रामपंचायत कार्यालय व तलाठी कार्यालयाला रविवारी सुट्टी असते. अमान्य की, सुट्टीच्या दिवशी शासकीय काम करावयाचे असल्यास कोतवाल यांना तलाठयांची परवानगी लागते. हे खरे की, सन २०१८ मध्ये कृष्णा नदीपात्रातून वाळूचे उत्खनन करायची नाही व वाहतुक करावयाची नाही असा ठराव आम्ही पारीत केला होता. अमान्य की, सदर ठराव हा केवळ मर्ढे गावातील लोक सोडून इतर लोकांसाठी होता. अमान्य की,वाळू काढण्यावरून मर्ढे व आणेवाडी गावातील लोकांमध्ये वाद सुरू होता. अमान्य की, त्या वादावरून आम्ही खोटी फिर्याद दाखल केली आहे.

JAGRUTI SUBHASH BHATIA

Digitally signed by JAGRUTI SUBHASH BHATIA
Date: 2025.12.23 17:30:54 +0530

१०. अमान्य की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. अमान्य की, आरोपीने शासकीय कामात अडथळा आणल्यामुळे कोतवालने फिर्याद दिली हे मी खोटे सांगतो. कोतवाल रोहित धुमाळ हे आमच्या गावचे रहिवासी आहेत. त्यांचे व माझे चांगले संबंध आहेत. ते राहण्यास देखील माझेच गावात आहेत. दिनांक २९/०७/२०१८ रोजी माझेकडे कॅमेरा असलेला फोन नव्हता. अमान्य की, रोहित धुमाळ हे माझे गावचे असल्याने त्यांना हाताशी धरून आम्ही ही खोटी केस केली आहे. या संदर्भात दिनांक ३०/०७/२०१८ नंतर माझा पोलीस ठाण्यात जाण्याचा योग आला नाही. तुषार हिंदुराव शिंगटे हे माझे गावचे असून त्यांचेशी माझे चांगले संबंध आहे. अमान्य की, कोणतीही घटना घडली नसताना मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही. समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

JAGRUTI SUBHASH BHATIA

Digitally signed by JAGRUTI SUBHASH BHATIA
Date: 2025.12.23 17:30:08 +0530

दिनांक २३.१२.२०२५ ( जा. सु. भाटिया )

तदर्थ अतिरिक्त सत्र न्यायाधीश–१
सातारा